Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

**(अंतिम वर्षास प्रवेशित असलेले तथापि अनुषेश (Backlog) असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुर्नपरीक्षेबाबत)**

**संदर्भः या कार्यालयाचे शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/406, दि. 09 डिसेंबर, 2020**

उन्हाळी 2020 मधील **अंतिम वर्षास प्रवेशित असलेले तथापि अनुशेष (Backlog) असलेल्या सर्व अभ्यासकमाच्या विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत लेखी** परीक्षा ऑक्टोंबर, 2020 मध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर घेण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर परीक्षेच्या कालावधीमध्ये काही विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा, कोवीड–19 प्रादुर्भाव, गैरहजर अथवा तांत्रिक कारणामुळे परीक्षेस प्रविष्ठ होता आलेले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या **पुर्नपरीक्षा** दि. 15 डिसेंबर, 2020 ते दि. 31 डिसेंबर, 2020 या कालवधीत (विषम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत निश्चित केलेल्या धोरणानुसार (समन्वयक/अग्रणी महाविद्यालय/विद्यापीठ अधिविभाग स्तरावर) घेण्यात याव्यात असे उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या यापूर्वीच्या ठरावानुसार **अंतिम वर्षास प्रवेशित असलेले तथापि अनुशेष (Backlog) असलेल्या सर्व अभ्यासकमाच्या (पदवी परीक्षा) विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत (उदा. 6 सत्र अभ्यासकमातील सत्र 4 व 5, तसेच 8 सत्र अभ्यासकमातील सत्र 6 व 7 इत्यादी) लेखी पुर्नपरीक्षा** अग्रणी/समन्वयक महाविद्यालयामार्फत आयोजित न करता सदर परीक्षा महाविद्यालय/शैक्षणिक संस्था स्तरावर आयोजित करण्यात याव्यात.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ कं.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/** 413
**दिनांकः–** 14 DEC 2020

प्रति,
1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
5. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
6. जनसंपर्क अधिकारी
7. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासकमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.